**मे. कैलासबापू ॲग्रो इंडस्ट्रीज प्रोडयुसर कंपनी लि., गट क्र. ९४/२, मांडुर्णे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांच्या प्रस्तावित डिस्टीलरी (१०५ किलो लिटर प्रति दिवस उत्पादन / मोलायसेस / ग्रेन / केन ज्युस बेस्ड डिस्टीलरी) या प्रकल्पाची दि. १८/०५/२०२१ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

मे. कैलासबापू ॲग्रो इंडस्ट्रीज प्रोडयुसर कंपनी लि., गट क्र. ९४/२, मांडुर्णे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांच्या प्रस्तावित डिस्टीलरी (१०५ किलो लिटर प्रति दिवस उत्पादन / मोलायसेस / ग्रेन / केन ज्युस बेस्ड डिस्टीलरी) या प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. १८/०५/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव येथून व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२१०५१०-FTS-००४९ दि. १०/०५/२०२१ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) जिल्हादंडाधिकारी, जळगांव<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - सदस्य

३) उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव - समन्वयक

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) मा. अभिजित राऊत, भा.प्र.से.<br>जिल्हादंडाधिकारी, जळगांव

२) डॉ. प्रविण जोशी,<br>प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) श्री. सो. म. कुरमुडे<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच महसूल विभागाचे अधिकारी व जळगांव जिल्हयातील व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून दि. २३/०१/२०२१ रोजी सदरच्या प्रस्तावित प्रकल्पाकरिता प्रकल्पाधारकास टर्म्स ऑफ रेफरन्स (T.O.R.) प्राप्त झालेला असून प्रकल्पाधारकाने दि.२३/०३/२०२१ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणी घेण्याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.१८/०५/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता पर्यावरण विषयक लोकसुनावणी आयोजीत करण्याबाबत निश्चित करण्यात आले. ३० दिवस अगोदर दि.१५/०४/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रकाशित करण्यात आली होती. तसेच प्रकल्पाधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालय तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) तहसिल कार्यालय, चाळीसगांव.
५) उप-विभागीय कार्यालय, चाळीसगांव.
६) ग्रामपंचायत कार्यालय, मांडुर्णे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव.
७) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव, हॉल ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट,जळगांव – ४२५००१.
८) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
९) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१०) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
११) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

तद्नंतर सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत डॉ. संग्राम घोघरे, प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर अहवाल सादर केला. तसेच सदरील प्रस्तावित प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे या प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावित प्रकल्पाबाबत एकही लेखी निवेदने प्राप्त झालेले नाही असे सांगितले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. मनिष पाटील, टाकळी (प्र.दे.)** स्पेंटवॉश किती तयार होणार व त्याची विल्हेवाट कशी लावणार. | **प्रवर्तक** – स्पेंटवॉश हा वेगवेगळया उत्पादन प्रक्रियेतून तयार होईल. सदरच्या उत्पादन प्रक्रियेसाठी मोलॅसिस, ऊसरस व कडधान्ये हे कच्चा माल म्हणून वापरला जाईल. फक्त मोलॅसिस व ऊसरस यापासून जास्त तीव्र व जास्त प्रमाणात स्पेंटवॉश तयार होईल. स्पेंटवॉश एम.ई.ई.मध्ये इव्हॅपोरेट व कॉन्सनट्रेट केला जाईल. कॉन्सनट्रेट स्पेंटवॉश कोरडा करून त्याची पावडर केली जाईल. ही पावडर खत म्हणून वापर करण्यात येईल. |
| २ | **श्री. रामेश्वर ठाकरे, पिलखोड** – सदरच्या प्रकल्पामध्ये रोजगार कसा व किती प्रमाणात असेल ? | **प्रवर्तक** – ३ प्रकारचे रोजगार उपलब्ध होणार असून त्यात प्राथमिक स्वरुपाचे - १५० तर ५० ते ६०% कामगार हे व्दितीय व तृतीय स्वरुपाचे राहणार असून साधारण १००० रोजगार निर्माण होईल. |
| ३ | **श्री. शिवाजी सोनवणे, उमरदे** – या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना काय फायदा होईल आहे ? | **प्रवर्तक** - ८५ ते ९० % स्थानिक लोकांना रोजगार मिळणार असून स्थानिक शेतकऱ्यांकडून कडधान्ये व ऊस विकत घेण्यात येईल. तसेच सीएसआयआर च्या अंतर्गत विविध योजना राबविण्यात येतील. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या स्थानिक लोकांना, गावाला व ग्रामपंचायतला त्याचा फायदा होईल. तसेच सामाजिक व आर्थिक फायदा सुध्दा होईल. |
| ४ | **श्री. सतीश पाटील, तळवाडी, ता. मालेगांव** – प्रकल्पातील बॉयलरला कोणते इंधन वापरले जाईल व प्रदूषण रोखण्यासाठी कोणती यंत्रणा बसविण्यात येईल ? | **प्रवर्तक** – बॉयलरला बगॅस इंधन म्हणून वापरण्यात येईल. ३० टन प्रति तास क्षमतेच्या बॉलयरला ५० मी. उंचीची चिमणी उभारुन त्याला (४ फिल्ड, ५ पास) इलेक्ट्रोस्टेस्टीक प्रेसीप्रेटर ही हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात येईल. तसेच OCMS बसविण्यात येऊन CPCB व MPCB सर्व्हरला जोडण्यात येईल. |
| ५ | **श्री. दिपक सुर्यवंशी, अमोदे** – प्रकल्पातून किती प्रमाणात अल्कोहोल तयार होईल. | **प्रवर्तक** – १०५ किलो लिटर प्रति दिवस |
| ६ | **श्री. सचिन पाटील, पिंपळगांव (राज देहरे)** - सदरच्या प्रकल्प एकूण खर्च किती असेल ? | **प्रवर्तक** – सदरचा प्रकल्प हा प्रस्तावित असून त्यासाठी एकूण रुपये १०८ कोटी खर्च अपेक्षित आहे. |

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
| --- | --- | --- |
| ७ | **श्री. जितेंद्र सुर्यवंशी, टाकळी (प्र.दे.)** – सदरच्या प्रकल्पामधून जे काही सांडपाणी निर्माण होईल त्याचे नियोजन कसे असेल. | **प्रवर्तक** – सदरच्या उत्पादन प्रक्रियेतून स्पेंटवॉश मध्ये जास्त तर कंडेन्सेट मधून काही प्रमाणात सांडपाणी निर्माण होईल. स्पेंटवॉश चे Bio-methanation केले जाईल. स्पेंटवॉश एम.ई.ई.मध्ये इव्हॉपोरेट व कॉन्सनट्रेट केला जाईल. कॉन्सनट्रेट स्पेंटवॉश कोरडा करून त्याची पावडर केली जाईल. ही पावडर खत म्हणून वापर करण्यात येईल. सर्व सांडपाणी प्रस्तावित कंडेन्सेट पॉलीशींग युनिटमध्ये प्रक्रिया केली जाईल. प्रक्रिया केलेले सांडपाणी १००% पुर्नवापर करु अशी ZLD योजना राहणार आहे. |
| ८ | **श्री. तुषार खैरनार, देवळी** – सदरचा प्रकल्प हा किती दिवस चालणार आहे. | **प्रवर्तक** – साधारणत: ३३० ते ३४० दिवस चालाणार आहे. |
| ९ | **श्री. समाधान पाटील, देशमुखवाडी** सदरच्या प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषणावर काही आघात होईल का ? | **प्रवर्तक** – प्रकल्पामध्ये बॉलयर व टरबाईन हाऊस, क्रॉम्प्रेसरर्स हे आवाज निर्माण करणारे स्त्रोत असतील. ध्वनी प्रदूषण नियंत्रासाठी आसोलेशन, स्पेरेशन व इन्सुलेशन अशी तंत्रे वापरली जातील. |
| १० | **श्री. मनोहर पाटील, चाळीसगांव** – वासाच्या नियंत्रणासाठी काय उपाययोजना असणार आहे. | **प्रवर्तक** – औद्योगिक प्रक्रियेतून ईस्ट स्लज फुसफुसन्याच्या क्रिया, स्पेंटवॉश व मोलॉसिस हे वासाचे स्त्रोत असतील. सदरील प्रक्रिया ही ड्राय प्रोसेस असून त्यातील आर्द्रता काढण्यात येईल. आर्द्रता काढल्यामुळे दुर्गंधी कमी होईल. |
| ११ | **सौ. भारती पाटील, पो. पा. मांडुर्णे** – मांडुर्णे गावाला या प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रास होईल का ? | **प्रवर्तक** – ध्वनी प्रदूषण हा उत्पादन प्रक्रियेमधून निर्माण होत असून त्याचा परिणाम कारखान्याच्या जवळपासून तर लांबपर्यंत होत असतो. Ambient Noise हा कारखान्याच्या बाहेरील तर Workzone noise हा कारखान्याच्या आतील असतो. प्रकल्पामध्ये बॉलयर व टरबाईन हाऊस, क्रॉम्प्रेसर हे आवाज निर्माण करणारे स्त्रोत असतील. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी आयसोलेशन, स्पेरेशन व इन्सुलेशन अशी तंत्रे वापरली जातील. सदरच्या ठिकाणी ध्वनीची पातळी कायद्यानुसार 75 dBA च्या आत राहील. तरी सदरची ध्वनी पातळी ही कारखान्याच्या आतील असल्यामुळे आपल्यापर्यंत वा कारखान्याच्या बाहेर येईपर्यंत ध्वनीची तीव्रता राहणार नाही. |
| १२ | **श्री. रोहिदास पाटील, आमेदे, ता. नांदगाव** – प्रकल्पासाठी लागणारी वीज ही आपण तयार करणार आहात की बाहेरुन घेणार आहात ? तसेच गोबर गॅसचे नियोजन (Bio-Methanation) आहे का ? | **प्रवर्तक** – सदरच्या प्रकल्पामध्ये बॉलयर व टरबाईन असेल. बॉयलर मध्ये उच्च दाबाची वाफ असते ती टरबाईन मध्ये सोडल्यानंतर टरबाईन मधून विद्युत निर्मीती होईल. त्यामुळे प्रकल्पासाठी बाहेरुन वीजेची आवश्यकता भासणार नाही. फक्त इतर कामांसाठीच वीज बाहेरुन घेण्यात येईल. तसेच Bio-Methanation पासून जो काही गॅस तयार होईल तो बॉयलर ला वापरला जाईल. त्यामुळे कारखान्याचे इंधन वाचेल व प्रदूषणसुध्दा कमी होईल. |

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १३ | **श्री. दगडू पाटील, मांडुर्णे** – सांडपाणी जमीनीत मुरल्यानंतर काही दुष्परिणाम होईल का? | **प्रवर्तक** - सांडपाणी हे कुठल्याही पर्यावरण घटकाच्या (जमीन व पाण्याच्या) संर्पकातच येणार नाही. ५ दिवसांसाठी साठवूक ठेवण्याकरीता आरसीसी टाकी उभारणार असून तो पॉवडर विभागाला जोडण्यात येईल. त्याचा जमीनीशी कोणताही संर्पक येणार नाही. सर्व सांडपाणी प्रस्तावित कंडेन्सेट पॉलीसी युनिटमध्ये प्रक्रिया केली जाईल. प्रक्रिया केलेले सांडपाणी १००% पुर्नवापर करु अशी ZLD योजना राहील. |
| १४ | **श्री. मनोहर पाटील, चाळीसगांव**- फ्लॅश टाकी, सांडपाणी टाकी वा डायजेस्टर व्यवस्थापनमध्ये जर बिघाड झाले तर जमीन / पाणी प्रदूषित होऊ नये त्यासाठी काय उपाययोजना आहेत ? | **प्रवर्तक** – जर काही अपघात वा समस्या निर्माण झाली तर आपत्कालीन योजना असेल. स्पेंटवॉशची टाकी ही संपूर्णपणे आरसीसीची बांधलेली राहील. तरी काही कारणास्तव त्यातून हळूहळू वा एकदम गळती झाली तर तो प्रकल्पाच्या नैसर्गिक निचरा होण्याच्या ठिकाणी अडविण्यात येऊन पंपाव्दारे उचलण्यात येईल. |
| १५ | **सौ. सुनंदा दगडू पाटील, सरपंच, मांडुर्णे** - गावातील तरुण व बेरोजगारांना रोजगार देऊन गावातील शेतकऱ्यांचा विकास करावा, ही विनंती. | **चेअरमन**- प्रल्कपामध्ये ८० ते ९०% रोजगार हा स्थानिक लोकांनाच मिळणार असून शेतकऱ्यांकडून कडधान्ये व ऊस खरेदी करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. |
| १६ | **डॉ. प्रविण जोशी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक**- जर Untreated effluent discharge झाला तर प्रकल्पाच्या 5 Km पर्यंतच्या परिसरातील possibility of soil contamination & over a period of time may affected physical, chemical properties of soil याबाबत आपण soil & micro testing हे प्रल्कप धारकाने करावे. तसेच प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा प्रणाली अपयशी झाली तर उत्पादन प्रक्रिया ही स्वयंचलित बंद झाली पाहिजे व इंन्टरलॉकींग प्रणाली असली पाहिजे. सदरचा प्रकल्प हा 17 Categories Industries मध्ये मोडत असल्यामुळे प्रकल्पामध्ये OCMS लावून ते CPCB व MPCB सर्व्हरला जोडण्यात यावे. तसेच संमतीपत्र घेऊन अटी व शर्तीचे तंतोतंत पालन व्हावे. O & M च्या समस्या असतात त्या वेळोवेळी व्यवस्थित कराव्यात. पर्यावरण सेलची स्थापना करावी. | **प्रवर्तक**- सदरच्या पुर्तता करण्याबाबत आश्वासन दिले. |

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १७ | **श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, जळगांव-** मा. जिल्हाधिकारी यांनी १० किमी पर्यंतच्या परिसरातील अस्तित्वात असलेले पाण्याचे स्त्रोत, वाडे, शाळा, कॉलेज यांचा पर्यावरण विषयक अभ्यास करण्यात यावा, याबाबतची सुचना करण्यात आली, असल्याचे सांगितले. | **प्रवर्तक**- सदरच्या पुर्तता करण्याबाबत आश्वासन दिले. |

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

श्री. सो. म. कुरमुडे यांनी नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्याची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने त्यांनी सर्वांचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(सो. म. कुरमुडे)
समन्वयक
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगांव

(डॉ. प्रविण जोशी)
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

(अभिजित राऊत) भा.प्र.से.
अध्यक्ष
तथा
जिल्हादंडाधिकारी, जळगांव